ISSN 2349-638x
Impact Factor 5.707

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

## SPECIAL ISSUE No.46

Executive Editor
Dr. S.M. Maner
Principal
Tuljabhavani Mahavidyalaya
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor

Dr. T. L. Barbole
Head, Dept. of Economics

Dr. B. W. Gund
Head, Dept. of Pol. Science

Prof. N. B. Kale
Head, Dept. of Commerce

Prof. B. J. Kukade
Head, Dept. of Sociology

Chief Editor
Prof. Pramod Tandale

Scanned with OKEN Scanner

| Sr.No. | Author Name | Title of Article / Research Paper | Page No. |
|---|---|---|---|
| | | HINDI | |
| 90. | प्रा.डॉ. सूर्यकांत माधवराव दळवे | दलित विमर्श (यादों के पंछी के संदर्भ में) | 250 |
| 91. | डॉ. ज्ञानेश्वर देशमुख | भूमंडलीकरण से प्रभावित उपन्यासों में किसान विमर्श | 252 |
| 92. | डॉ. अशोक मर्डे | २१ वीं सदी के भारत की तस्वीर – 'जलता हुआ रथ' | 255 |
| 93. | डॉ इन्दू के वी | प्रवासी साहित्यविमर्श : यू के की पंजाबी प्रवासी कहानियों का मनोवैज्ञानिक परिप्रेक्ष्य तेजेंद्र शर्मा की कहानियों के विशेष सन्दर्भ में | 258 |
| 94. | डॉ. सुब्राव नामदेव जाधव<br>किशोर श्रीमंत ओहोळ | मिथिलेश्वर के झुनिया उपन्यास में स्त्री विमर्श | 262 |
| 95. | प्रा.डॉ. संजय व्यंकटराव जोशी | रेडिओ नाटक 'ऊष्मा' | 264 |
| 96. | प्रा.वालिका रामराव कांवळे | नारी अस्मिता की पहचान : जान की जान गयी है | 266 |
| 97. | रमा धनराज मन्नाडे | 21 वी सदी का हिंदी कथा साहित्य और विविध विमर्श (कहानी उपन्यास, नाटक) | 268 |
| 98. | श्री सतीश कृष्णात पाटील कोले | २१ वीं सदी की हिंदी कहानी और बाजारवाद | 270 |
| 99. | डॉ.श्रीलता पी.वी. | अनामिका की कविता में अभिव्यक्त स्त्री संघर्ष | 272 |
| 100. | प्रा. सुनील प्रकाश खोत | २१ वीं सदी के प्रथम दशक के हिंदी कथा साहित्य में 'दलित विमर्श' (उपन्यास और कहानी के संदर्भ में ) | 275 |
| 101. | प्रा.डॉ.पल्लवी भुदेव पाटील | इक्कीसवी सदी के कहानी विधा में व्यक्त स्त्री विमर्श | 277 |
| 102. | प्रा.महेश नाना भोपळे<br>प्रा.पल्लवी वसंत बनसोडे | २१ वी सदी का हिंदी गद्य साहित्य और विविध आयाम कस्तुरी कुंडल बसे : स्त्री विमर्श | 279 |
| 103. | श्री. मेघराज धोंडिराम खरटमोल | इक्कीसवी सदी के हिंदी साहित्य में दलित विमर्श | 281 |
| 104. | प्रा.नीलेश वसंतराव जाधव | संजीव के : 'फाँस' उपन्यास में चित्रित किसान विमर्श | 283 |
| 105. | श्री.महेश बापूराव चव्हाण | तरुण भटनागर के 'फोटो का सच' कहानी में चित्रित वृद्धावस्था विमर्श | 285 |
| | | ECONOMICS | |
| 106. | प्रा.डॉ. सी.जे देशमुख | जागतिक करणानंतर भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम | 287 |
| 107. | श्रीमती प्रा. डॉ. मिनाश्री भास्कर जाधव | जागतिकीकरणानंतरचा आंतरराष्ट्रीय व्यापार | 291 |
| 108. | डॉ. ए. बी. मुळीक<br>डॉ. टी. एल. बारबोले | जागतिकीकरणानंतर भारतीय अर्थव्यवस्था : एक दृष्टीक्षेप | 293 |




Scanned with OKEN Scanner

# जागतिकीकरणानंतरचा आंतरराष्ट्रीय व्यापार

**श्रीमती प्रा. डॉ. मिनाश्री भास्कर जाधव**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,
कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद 413507

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्यानंतर भारताच्या व्यापार धोरणात परिवर्तन झाले आणि भारतीय व्यापाराच्या विदेशीकरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली. सरकारने देशी उद्योगांना संरक्षण प्रदान करण्याच्या उद्देशाने आयात धोरण जाहीर केले. यामध्ये आयातीवर नियंत्रण, आयात पर्यायीकरण इत्यादींचा समावेश होता. सरकारने अनेक देशांबरोबर द्विपक्षीय तसेच बहुपक्षीय करार केले. 1956 नंतर परकीय चलन संकटामुळे आयातीवरील नियंत्रण वाढवावे लागले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपर्यंत भारताचे परकीय धोरण आयात पर्यायीकरणावर केंद्रीत होते. भारताकडे परकीय चलन साठा मर्यादीत ठेवणे गरजेचे होते. अशा परिस्थितीमध्ये 1962 मध्ये मुदलियार समितीने भारताच्या परकिय व्यापार धोरणाचे व्यापक परिक्षण केले. 1966 च्या अवमुल्यनानंतर थोड्या प्रमाणात आयात उदारीकरण घडवून आणण्यात आले होते. तिसऱ्या योजनेमध्ये निर्यात वृद्धीचे धोरण स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला. वाढती परकीय व्यापार तूट व व्यवहार तोलाचे संकट हे होते. 1952 ते 66 च्या दरम्यान भारताचे निर्यात धोरण अक्रियशील होते व त्यामुळे भारताचा जागतिक व्यापारातील हिस्सा कमी होत गेला. 1970 मध्ये मुदलियार समिती 1962 च्या शिफारशीनुसार प्रथमच निर्यात धोरणाची घोषणा करण्यात आली. 1981 मध्ये पहिल्यांदा संयुक्त आयात-निर्यात धोरण घोषीत करण्यात आले. 1985 रोजी तत्कालिन वाणिज्य मंत्री व्ही. पी. सिंग यांनी प्रथमच त्रिवार्षीय आयात-निर्यात धोरण जाहीर केले. जुलै 1991 मध्ये आर्थिक सुधारणा लागू करण्यात आल्यानंतर पंचवार्षिक व्यापार धोरण घोषीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. भारताचे पहिले पंचवार्षिक आयात-निर्यात धोरण एप्रिल 1992 ते 1997 या कालावधीसाठी वाणिज्य मंत्री पी. चिदंबरम यांनी घोषीत केले.

जागतिकीकरणाच्या युगात आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार होऊ लागला आहे. अलिकडच्या काळात वाहतूक आणि दळणवळणाच्या क्षेत्रातल्या तांत्रिक प्रगतिमुळे आर्थिक व्यवहारांचे आंतरराष्ट्रीयकरण झाल्याचे आपल्याला दिसून येते. व्यापार हा अर्थव्यवस्थेला उर्जितावस्थेकडे घेऊन जाणारा व्यवहार आहे.

ज्याप्रमाणे समाजात एखादी व्यक्ती इतरांशी विनिमय व्यवहार न करता सामान्य आयुष्य जगू शकत नाही. त्याप्रमाणे आधुनिक काळात राष्ट्रांनादेखील परस्पर विनिमय व्यवहार न करता स्वयंपूर्ण राहणे अवघड होत चालले आहे.

**व्याख्या :**

आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे केवळ वस्तूंची देवाण-घेवाण नव्हे तर वस्तूंच्या उत्पादनात गुंतलेल्या सामग्रीची देवाण-घेवाणही त्यात अंतर्भूत असते. या देवाण-घेवाणीत सर्वांत महत्त्वाचा व्यवहार म्हणजे वस्तूंचे उत्पादन कसे करायचे याच्या ज्ञानाचा व्यवहार होय. (The knowledge of how to produce things) या ज्ञानाच्या देवाण-घेवाणीतूनच जागतिक अर्थव्यवस्थेत फार मोठे बदल घडून आले आहे.

**संशोधन अभ्यासाची उद्दीष्टे :**

1. जागतिकीकरणानंतर भारतीयांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावला आहे का? याचा सखोल अभ्यास करणे.
2. जागतिकीकरणानंतर भारताच्या उत्पन्नाच्या दर्जा उंचावला आहे का? हे जाणून घेणे.
3. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात जागतिकीकरणानंतर वाढ झाली आहे का हे तपासणे.
4. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशाच्या रोजगारात वाढ झाली आहे का? याचा अभ्यास करणे.

**संशोधन अभ्यासाची गृहितके :**

1. जागतिकीकरणानंतर भारताच्या विदेशी व्यापारात वाढ झाली आहे.
2. जागतिकीकरणानंतर भारतीय लोकांच्या जीवनमानाचा राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे.
3. जागतिकीकरणानंतर भारतामध्ये औद्योगिक उत्पादनात वाढ झाली आहे.

**जागतिकीकरण आणि भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार :**

गॅटच्या 8 व्या फेरीला उरूग्वे फेरी असे म्हटले जाते. उरूग्वे फेरी जिनिव्हा येथे संपुष्टात आली. प्रत्येक सदस्य देशाने हा प्रस्ताव एक तर पूर्णपणे नाकारावा अन्यथा तो आहे त्या स्वरूपात कोणत्याही बदलाची अपेक्षा न करता स्वीकारावा असे दोनच पर्याय होते. 15 एप्रिल 1994 रोजी भारतासह 124 देशांनी या प्रस्तावावर सह्या केल्या आणि 1 जानेवारी 1995 रोजी (WTO) जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली. जागतिक व्यापार संघटनेचे मुख्य उद्दिष्ट व्यापाराच्या उदारीकरणासाठी व्यापारावरील निर्बंध कमी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय वाटाघाटींकरता एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे होय. व्यापार आणि देवाण-घेवाण वाढविण्यासाठी सर्व देशांनी मिळून आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतिक व्यापार संघटना तयार केली आहे. भारताबाबत बोलायचे झाले तर आर्थिक क्रांती नंतर भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ झाली.

भारतात नव्या आर्थिक धोरणा अंतर्गत आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या उदारीकरणावर भर देण्यात आला आहे. भारतात इ.स. 1991 मध्ये नवीन आर्थिक धोरणाची सुरूवात झाली. इ.स. 1995 मध्ये जागतिक व्यापार संघटनेने गॅटची जागा घेतली आणि आक्रमकपणे



Scanned with OKEN Scanner

व्यापार उदारीकरणावर भर दिला. परंतु व्यापाराच्या उदारीकरणाला भारतात त्या अगोदरच म्हणजे इ.स. 1992 मध्येच सुरवात झाली होती.

भारतात 1995-96 मध्ये भारतातून विविध वस्तूंची एकूण 106353 कोटी रूपयांची निर्यात झाली. त्यापैकी शेतीसंबंधीत वस्तूंची निर्यात (प्राथमिक वस्तूंची निर्यात) जवळजवळ 20 टक्के होती तर उत्पादित वस्तूंची निर्यात ही जवळजवळ 75 टक्केच्या आसपास होती. यावरून असे लक्षात येते की, स्वातंत्र्य मिळाले तेंव्हा भारत हा मागासलेला देश होता. कारण स्वातंत्र्यानंतर काही वर्षे प्राथमिक वस्तूंची निर्यात होत होती. परंतु स्वातंत्र्यानंतर भारताने आर्थिक क्षेत्रात बऱ्यापैकी प्रगती केली आहे. त्यामुळे भारतातून पारंपारिक प्राथमिक वस्तूंशिवाय उत्पादित औद्योगिक वस्तूंची निर्यात होत आहे. त्यामुळे भारत हा आता मागासलेला देश राहिलेला नसून भारताच्या आर्थिक विकासाची पातळी उंचावली आहे.

सन 1995-96 मध्ये भारताचे एकूण 122678 कोटी रूपयांची विविध वस्तूंची आयात केली. त्यामध्ये पेट्रोलियम तेल व वंगणे यांच्या आयातीवर 25173 कोटी रूपये खर्ची पडले. तर भांडवली वस्तुंवर 28289 कोटी रूपये खर्च झाले. तसेच सध्या भारतात खतांचे उत्पादन होत असूनही भारताला खतांची मोठ्या प्रमाणात आयात करावी लागते. सन 1995-96 मध्ये भारताने खते व खतांच्या अन्य वस्तूंच्या आयातीवर 5628 कोटी रूपये खर्च केले.

स्वातंत्र्यानंतर भारताचा परराष्ट्रीय व्यापार 116 पटीने वाढला. हे जरी खरे असले तरी विदेशी व्यापारात आपली आयात खूप वाढली पण निर्यात मात्र त्या प्रमाणात वाढू शकली नाही.

सन 1992 ते 97 च्या आयात-निर्यात धोरणावर टिका जरी झाली तरी 192-97 चे भारताचे आयात-निर्यात धोरण भारताला लाभदायकच ठरले आहे. कारण या धोरणाने निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढली असून त्यामुळे भारताची परकीय चलनाची गंगाजळी अधिक मजबूत होत आहे.

31 मार्च 1997 रोजी तत्कालीन केंद्रीय वाणिज्य मंत्री व्ही. व्ही. रमैय्या यांनी भारताचे दुसरे पंचवार्षीक आयात-निर्यात धोरण (1997-2002 जाहिर केले) 31 मार्च 2002 रोजी भारताचे तिसरे पंचवार्षीक आयात-निर्यात धोरण (2002 ते 2007) मध्ये घोषीत करण्यात आले. 2009 पर्यंत भारताचा जागतिक व्यापारातील हिस्सा 1.5 टक्के वाढविणे हे उद्दिष्ट होते. वाणिज्य मंत्री निर्मला सितारामन यांनी 1 एप्रिल 2015 ते 31 मार्च 2020 या कालावधीसाठी परकीय व्यापार धोरण जाहीर केले. भारताचा जागतिक व्यापारातील हिस्सा 2020 पर्यंत सध्याच्या 3 टक्के हून दुप्पट करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी आयात पर्यायीकरण व निर्यात प्रोत्साहन यावर भर देण्यात आला आहे. जागतिक व्यापारात भारताचा वाटा 1950 मध्ये 1.78 टक्के होता. 1955 मध्ये तो 6 टक्के झाला. 2005 पर्यंत तो 1 टक्के होता. 2008 मध्ये तो 1.64 टक्के झाला. हा वाटा 2011 मध्ये 2.3 टक्के झाला. WTO च्या आकडेवारीनुसार 2015 मध्ये तो 2.2 टक्के होता. 2020 तो 3.28 टक्के करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

अशाप्रकारे 1991 नंतरच्या नवीन आर्थिक सुधारणांतर्गत जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाला सुरूवात झाली आणि देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली. देशाच्याच नव्हे तर जगाच्याच उत्पन्नात वाढ झाली आणि त्यामुळे जग ही एक बाजारपेठ बनली आहे. त्यामुळे भारतासह अनेक देशातील लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन जीवनमानाचा दर्जा उंचावलेला आहे.

**निष्कर्ष :**

1. जागतिकीकरणानंतर आंतरराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंध कमी झाल्याचे बऱ्याच अंशी साध्य झाले आहे.
2. WTO मुळे सभासद देशातील लोकांच्या उत्पन्न व राहणीमानात सुधारणा झालेली दिसून येते.
3. जागतिक व्यापार संघटनेमुळे सभासद देशांकडून आंतरराष्ट्रीय व्यापारात उदारीकरणाचे प्रमाण वाढले आहे.
4. जागतिकीकरणानंतर आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ झालेली दिसून येत आहे.
5. जागतिकीकरणामुळे विकसनशील राष्ट्रातील लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावलेला आहे.
6. जागतिकीकरणामुळे जग हे जवळ आलेलं आहे. त्यामुळे विकसित राष्ट्रातील नवीन संशोधाचा फायदा विकसनशील राष्ट्रांना होत आहे.

**संदर्भग्रंथ :**


1. डॉ. शिवाजी ढगे, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, के. एस. पब्लिकेशन.
2. डॉ. धनश्री महाजन, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, शशिकांत पिंपळापुरे, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा.
3. प्रा. के. एन. ठक्कर, प्रा. जी. व्ही. कुंभोजकर, भारतीय अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
4. चाणक्य मंडल, जानेवारी 2019.
5. डॉ. देसाई भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था.




Scanned with OKEN Scanner